# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १५३/२०११-१२/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. रावसो पांडुरंग भोसले,<br>मु.पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडल कार्यालय, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | विरुध्द पक्षकार |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. रावसो पांडुरंग भोसले, मु.पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी जत उप विभाग विरुध्द तक्रार दि. ८.१२.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार हा वितरण कंपनीचा अेजी-२०१ (२७००८०२७३३५) २२.६.१९९५ पासून ५ अश्वशक्तीचा ग्राहक आहे. सदरची वीज जोडणी घेतांना एच.पी. टॅरीफवर आधारीत वीज जोडणी घेतलेली आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार त्यांनी दि. २१.६.२००८ रोजी एच.पी. टॅरीफ बदलून मीटर टॅरीफ मागितला त्याप्रमाणे वि.प.ने त्यांना मीटर बसवून दिलेला आहे, परंतु आजतागायत त्यांना मीटर रिडींगप्रमणे वीज बीले येत नाहीत. तक्रारदारो शाखा कार्यालय कुंभारी येथे दि. ६.१०.२००९ रोजी दिलेल्या अर्जाची व मिळालेल्या पोचची प्रत जोडली आहे. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. १८.८.२०११ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. ५.११.२०११ ला आदेश पारीत करुन अर्जदाराच्या मागणी प्रमाणे मीटर रिडींग प्रमाणे देयके अदा करावीत व विलंबापोटी भरपाई देणेत यावी असे आदेश दिले. मंचाकडून अपेक्षित मदत - मीटर प्रमाणे रिडींगवर आधारीत देयके मिळावीत असा आदेश व्हावा व विलंब झालेला आहे हे निश्चित झालेस कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ७.१.२०१२ च्या लेखी अहवालात तक्रारदार ग्राहकाचे बील दि. २०.१२.२००८ ते सप्टेंबर २०११ पर्यंत प्रत्यक्ष मीटर रिडींग नुसार एकूण ३३ महिन्याच्या २९३९ युनिटसची आकारणी सवलतीच्या दरानुसार रु. ३२२०/- होते. तसेच मा. आयोगाच्या दरपत्रकानुसार सदरचे वीज बील रक्कम रु. ६०६३/- होते. तक्रारदार यांना सवलतीच्या दरानुसार वीज बील प्रत्यक्ष मीटर रिडींग नुसार दुरुस्त करुन पोहोच करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सदरील बाब विचारात घेवून ग्राहकास नुकसान भरपाई देण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. ११.१.२०१२ रोजी मंचासमोर सुनावणीस घेण्यात आली. ग्राहक प्रतिनिधी हजर. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, सहाय्यक अभियंता जत उप विभाग श्री. मैलापुरे, सहाय्यक लेखापाल श्री. लांडगे उपस्थित. श्री. खापरे यांनी मीटर बसविलेले आहे, मीटर रिडींग प्रमाणे बीले देण्याचे आदेश व्हावेत. दि. ६.१०.२००९ रोजी मीटर प्रमाणे बीले देण्याबाबत विनंती करुनही कांही कार्यवाही केली नाही. मीटर प्रमाणे बीले देण्यास विलंब झाला आहे, कृती मानके विनियमानुसार शेतीची वीज बीले ६ महिने वजा जाता ३३ महिन्यांच्या विलंबाची भरपाई मिळावी किंवा वीज देयकातून समायोजित होण्याबाबत आदेश व्हावेत अशी मागणी केली. श्री. लांडगे, सहाय्यक लेखापाल यांनी ग्राहकास प्रत्यक्ष मीटर रिडींगप्रमाणे बीले दुरुस्त करुन देऊ असे मंचासमोर सांगितले. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने तक्रारदार ग्राहकास मीटर रिडींग प्रमाणे बीले त्वरित द्यावीत असा आदेश देणेत येत आहे.

३) तक्रारदार ग्राहकास त्यांनी वि.प.विरुध्द मागणी केल्याप्रमाणे मीटर बसविल्यानंतर मीटर रिडींगप्रमाणे बीले देण्यास झालेल्या विलंबापोटी भरपाई मंजूर करण्यात येत आहे.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com